Pune Police

# प्रेस नोट दि.०८/०८/२०१७
## तडीपार गुन्हेगारास केली अटक

..............निगडी पोलीसांची कामगिरी..............

पुणे शहरात होत असलेल्या घरफोडया, वाहन चोरी, चैन चोरी अशा गुन्हयांना आळा घालणे कामी तसेच गुन्हयातील आरोपींना अटक करणे कामी मा.पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांनी व इतर वरिष्ठ अधिकारी यांनी वेळोवेळी सुचना देवून मार्गदर्शन केले त्याप्रमाणे निगडी पोलीस स्टेशनचे हद्दीत गुन्हयांना आळा घालणे कामी अधिकारी व कर्मचारी यांना मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विजयकुमार पळसुले व पोलीस निरीक्षक (गुन्हे) शंकर आवताडे यांनी वरिष्ठांनी दिलेल्या सुचनां प्रमाणे वेळोवेळी सापळे लावून, बातमीदारांकडून माहिती काढून कारवाई करणे बाबत सुचना देवुन मार्गदर्शन केले आहे.

दि.०८/०८/२०१७ रोजी पो.ना.१७ शिंदे, पो.ना.३६८५ सांवत, पो.ना. ६५२७ नाणेकर यांना बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, चिंचवड पोलीस स्टेशन कडील तडीपार असलेला इसम रवि शंकर लोंढे वय २३ वर्षे हा त्याचे साथीदारासह त्रिवेणीनगर चौक निगडी पुणे येथे येणार असून, त्याचेजवळ हत्यार आहे. अशी खात्रीशिर बातमी मिळाल्याने मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विजयकुमार पळसुले व पो.नि.गुन्हे श्री. शंकर आवताडे,यांना कळवुन त्याच्या मार्गदर्शन व सुचनेनुसार त्रिवेणीनगर चौक निगडी पुणे या ठिकाणी सहा. पोलीस निरीक्षक देवेंद्र चव्हाण, सहा.पोलीस फौजदार तापकीर, पो.ना.१७ शिंदे, पो.ना.३६८५ सांवत, पो.ना. ६५२७ नाणेकर, पो.ना.१६८५मावसकर, पो.हवा.४३७९ मरगळे, पो.ना.२५३९ तांबोळी, पो.ना.९७० मुलाणी यांचेसह सापळा लावुन त्यांना शिताफिने पकडून त्यांचेकडे चौकशी करता त्याचे नाव **रवि शंकर लोंढे वय २३ वर्षे रा. विजयनगर एल्प्रो कंपनी समोर चिंचवड गाव पुणे, गणेश लक्ष्मण औकिरे वय २२ वर्षे रा. गल्ली नं..५५५ संयोगनगर जाधववाडी चिखली पुणे** असे असुन त्यांचेकडे दोन लोंखंडी कोयते व एक पॅशन प्रो मोटार सायकल किं.रु. १५,४००/- चा माल मिळून आला म्हणुन त्याचेवर **निगडी पो. स्टे. गु.र.नं. ४१७/२०१७ भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५),मुंबई पोलीस अधिनियम सन-१९५१ चे कलम ३७(१) सह १३५ व मु.पो.अधि.१४२** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास देवेंद्र चव्हाण सहा.पो.निरीक्षक निगडी पोलीस ठाणे पुणे शहर हे करीत आहेत.

सदरची कामगिरी ही मा. श्री. शशिकांत शिंदे अप्पर पोलीस आयुक्त ,उत्तर प्रादेशिक विभाग पुणे,मा. श्री. गणेश शिंदे, पोलीस उपआयुक्त परि. ३ पुणे व श्री राम मांडुरके सहा.पोलीस आयुक्त पिंपरी विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली निगडी पोलीस स्टेशनकडील मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विजयकुमार पळसुले मा. पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. शंकर आवताडे, सहा. पोलीस निरीक्षक देवेंद्र चव्हाण, तात्या तापकीर, सुनिल शिंदे, चेतन सावंत, रमेश मावसकर, विश्वास नाणेकर, संजय मरगळे, शरीफ मुलाणी, जमिर तांबोळी, मच्छिंद्र घनवट, मंगेश गायकवाड यांनी केली आहे.

# Pune Police

### प्रेसनोट दिनांक ०५/०८/२०१७

### वाहन चोरी व घरफोडी करणाऱ्या गुन्हेगारांकडुन १६ गुन्हे उघड करुन घरफोडीचे २ गुन्हे व एकुण १४ वाहने व ५ मोबाईल जप्त करुन ६,३०,०००/- रुपयाचा माल हस्तगत केला

### .............. निगडी पोलीसांची कामगिरी ..........

निगडी पोलीस स्टेशनचे हद्दीत दिवसें दिवस घरफोडी व वाहन चोरीचे प्रमाण वाढल्याने निगडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री वियजकुमार पळसुले व पोलीस निरीक्षक गुन्हे श्री.शंकर आवताडे यांनी तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी यांना वाहन चोरीचे गुन्हयांना आळा बसावा या करीता ॲक्शन प्लॅन तयार करुन तपास पथकातील कर्मचा-यांची स्वतंत्र टिम तयार करुन त्यांना खब-या मार्फत माहिती काढण्यास वेळोवेळी सुचना देवुन मार्गदर्शन केले आहे.

तपास पथकाचे इन्चार्ज सहा.पो.निरीक्षक देवेंद्र चव्हाण व कर्मचारी,पो.ना. फारुक मुल्ला ,पो.ना.नितीन बहिरट,पो.हवा.१०८० जाधव,असे निगडी पोलीस ठाणेचे हद्दीत पेट्रोलिंग फिरत असताना यांना इसम नामे **संतोष मदनराव देशमुख वय २३ वर्ष रा. जाधववाडी जांभुळकर कमानीजवळ चिखली पुणे मुळगाव मुलावागाव ता.उमरखेड जि. यवतमाळ** हा स्प्लेन्डर प्लस मोटार सायकल नं. एम एच १४ एफ पी ९९३० किं.रु. ३५,०००/- सह मिळून आल्याने त्यास ताब्यात घेवून त्या हस्तगत करणेत आली असून, त्यास दाखल गुन्हयात अटक करुन त्याकडे विश्वासात घेवून तपास केला असता, त्याने निगडी पिंपरी,भोसरी, देहुरोड,हडपसर,चाकण,भागातुन दुचाक्या चोरुन त्यावरुन फिरुन त्या वेगवेगळे ठिकाणी दडवून ठेवल्याचे सांगितल्याने त्याचेकडून १) पल्सर मो.सा. नं. एम.एच.१४-डी.बी.८२२० किं.रु. ४०,०००/-,२)हिरोहोंडा स्प्लेंडर नं, एम.एच.१४-ए.के.-४५९ कि.रु.३५,०००/- ३) हिरो स्प्लेंडर नं, एम.एच.१४-डी.पी.-३९८६ कि.रु.३५,०००/- ४) हिरोहोंडा स्प्लेंडर प्लस नं, एम.एच.१४-सी.बी.-९८७३ कि.रु.३५,०००/- ५) हिरोहोंडा स्प्लेंडर नं, एम.एच.३४-ए.एल.-४७११ कि. रु.४०,०००/-६) हिरोहोंडा स्प्लेंडर नं, एम.एच.१२-एच.वाय .-७११८ कि.रु.४०,०००/- ७) पल्सर मो.सा.नं. एम.एच.१४-ए.टी.-१६५३ कि.रु.४०,०००/-८) पॅशन प्लस नं, एम.एच.१४-बी.पी..-६००१ कि.रु.३५,०००/- ९) हिरो होंडा पॅशन नं, एम.एच.१४-ए.जे.६०९१ कि.रु.३५,०००/- १०) महिंद्रा रोडीओ १२५ नं, एम.एच.४६-एम.-७०८४ कि.रु.४०,०००/- ११) होंडा ड्रिम युगा नं, एम.एच.१७-बी.जी.९२२४. कि.रु.४०,०००/- अशा एकूण **१२ दुचाकी किं.रु.४,५०,०००/-चा माल जप्त करणेत आला असून, त्याचेकडून निगडी पो. ठाणे कडील ५ गुन्हे, देहुरोड पो.ठाणे कडील १ गुन्हा, पिंपरी पो ठाणे कडील १,भोसरी पो.स्टे.कडील १,चाकण पो.स्टे कडील १,हडपसर पो.स्टे.कडील १ गुन्हा असे एकूण १० गुन्हे उघड झाले आहे.**

तसेच आरोपी नामे **१) गौरव अनिल सरोदे वय २० वर्षे रा. गुरुदत्त हौसिंग सोसा. बि. नं. एफ १ रुम नं.५ दळवीनगर निगडी पुणे २) मनोज जनार्धन सरोदे वय १९ वर्षे रा. गुरुदत्त हौसिंग सोसा. बि. नं. एफ १ रुम नं.३११ दळवीनगर निगडी पुणे** हे घरफोडी व वाहन चोरी करणारे गुन्हेगार असून, त्यांनी अशाच प्रकारचे गुन्हे केले आहेत. व ते सध्या राहते घरी आहेत. अशी बातमी पो.ना.फारुक मुल्ला, पो.ना. नितिन बहिरट मिळाल्याने त्यांना पकडून त्यांचेकडे चौकशी करुन १)निगडी पोलीस स्टेशन कडील गु.रं.नं. ३८३/२०१७ भा.द.वि.कलम ३८०,३४ मधील दोन चोरीचे मोबाईल हॅन्डसेट ,२) निगडी पो ठाणे गु.रं.नं.३८८/२०१७ भा.द.वि.कलम ३८०,३४ मधील तीन चोरीचे मोबाईल हॅन्डसेट, ३) निगडी पो ठाणे गु.रं.नं.२६३/२०१७ भा.द.वि.कलम ४५४,४५७,३८० मधील रोख रुपये ,४) पिंपरी पो ठाणे गु.रं.नं.२८७/२०१७ भा.द.वि.कलम ३७९ मधील पल्सर मो.सा.५) खडकी पो ठाणे गु.रं.नं.१८४/२०१७ भा.द.वि.कलम ३७९ मधील पॅशन प्लस असे एकूण **५ गुन्हे उघडकीस आणले असून, त्यांचेकडून एकूण किं.रु.१,१०,०००/- चा माल** हस्तगत करणेत आला आहे.

तसेच पो.हवा.नारायण जाधव,किरण खेडकर,शरिफ मुलाणी यांना मिळालेल्या माहितीवरुन **सलिम मुक्तार अहमद शेख वय २३ रा. फातिमा मशिदजवळ राजनगर ओटास्किम पुणे** यास ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातुन वॉल मिक्सर कॉक नळ साहित्य असा **किं.रु. ७०,०००/- चा माल** हस्तगत करुन,निगडी पो.स्टे.गु.र.नं.४३७/२०१७ भा.दं.वि.क.४५४,४५७,३८० गुन्हा उघडकीस आणला आहे. पुढील तपास देवेंद्र चव्हाण सहा.पोलीस निरीक्षक निगडी पो.स्टे.पुणे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त सो। पुणे शहर, मा.सह पोलीस आयुक्त सो। पुणे शहर, मा.अप्पर पोलीस आयुक्त सो। उत्तर प्रादेशिक विभाग श्री शशीकांत शिंदे, मा. पोलीस उपआयुक्त सो.श्री गणेश शिंदे, मा.सहायक पोलीस आयुक्त सो पिंपरी विभाग श्री.राम मांडुरके यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विजयकुमार पळसुले,पोलीस निरीक्षक गुन्हे श्री.शंकर आवताडे,सपोनि देवेंद्र चव्हाण,सपोनि प्रशांत अहिरे,तात्या तापकीर, फारुक मुल्ला.नितीन बहिरट,नारायण जाधव,आनंद चव्हाण, मच्छिंद्र घनवट, किरण खेडकर,रमेश मावस्कर,जमिर तांबोळी, शरीफ मुलाणी, अशोक जगताप यांनी केली आहे.